MHAU060003042025

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ८६/२०२५**

**रामकृष्ण मोतिंगे व इतर वि. महराष्ट्र शासन व शोभा जाधव**

**निशाणी क्र.१ खालील आदेश**

१. अर्जदाराने सदरचे प्रकरण हे बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट अन्वये वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळण्यासाठी दाखल केलेले आहे.

२. अर्जदार क्र. १ ते ४ व गैरअर्जदार क्र. २ यांच्या आई रुख्मणबाई बबनराव मोतिंगे या होत्या. त्या दिनांक २१.०८.२०१३ रोजी मौजे बनशेंद्रा, ता.कन्नड येथे मयत झालेल्या आहेत. मयताचे पती व अर्जदारांचे वडील बबनराव देवराव मोतिंगे हे दिनांक १६.०८.२०१७ रोजी मयत झालेले आहेत. मयत रुख्मणबाई बबनराव मोतिंगे यांना अर्जदार क्र. १ ते ४ व गैरअर्जदार क्र. २ यांच्या शिवाय कोणीही वारस नाहीत. त्यामुळे, अर्जदार क्र. १ ते ४ व गैरअर्जदार क्र. २ हेच मयत रुख्मणबाई बबनराव मोतिंगे यांचे कायदेशीर वारस आहे असे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. गैरअर्जदार क्र. २ हे अर्जदारांसोबत अर्जदार होण्यास तयार नसल्यामुळे त्यांना गैरअर्जदार करण्यात आलेले आहेत. गैरअर्जदार क्र. २ यांना नोटीसची बजावणी होवून देखील त्या प्रकरणात हजर झालेल्या नाहीत. त्यामुळे प्रकरण त्यांच्याविरुध्द एकतर्फा चालवून गुणदोषावर निकाली काढण्यासाठी घेण्यात आलेले आहे.

३. अर्जातील कथनाच्या सत्यतेसाठी अर्जदार क्र. ३ यांनी स्वतःचे सरतपासणीचे शपथपत्र निशाणी क्र. ११ नुसार अभिलेखावर दाखल केले असुन सदर शपथपत्रात अर्जातील कथनाचा पुनरुल्लेख केला आहे.

४. अर्जदाराने अर्जासोबत मयत रुख्मणबाई बबनराव मोतिंगे व बबनराव देवराव मोतिंगे यांचे मृत्यू दाखल्याची प्रत व अर्जदार क्र. १ ते ४ व गैरअर्जदार क्र. २ यांच्या आधार कार्डची झेरॉक्स प्रत नि.क्र. ४ लगत दाखल केलेली आहेत. तसेच अर्जदारातर्फे पुरावा बंद पुरसिस नि.क्र.१२ अन्वये दाखल केली आहे.

**५.** अर्जदाराने अर्जाच्या अनुषंगाने न्यायालयामार्फत मराठी वृत्तपत्र 'लोकपत्र' या दिनांक ३०.०४.२०२५ रोजीच्या अंकात जाहीर प्रगटन प्रसिध्द निशाणी क्र. १० अन्वये दाखल करण्यात आले. मात्र मुदतीत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही.

**६.** वरील कागदपत्रांच्या अनुषंगाने अर्जदारांनी मागणी केल्याप्रमाणे अर्जदार हेच त्यांच्या नावे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र असल्याबाबतचे दिसुन येत आहे. त्यामुळे कायदेशीर वारस प्रमाणपत्र अर्जदार यांच्या नावे देणे न्यायोचीत होईल म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश करते.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येतो. |
| २ | अर्जदार क्र. १. रामकृष्ण बबनराव मोतिंगे, अर्जदार क्र. २ विष्णु बबनराव मोतिंगे, अर्जदार क्र. ३ विश्वास बबनराव मोतिंगे, अर्जदार क्र. ४ कुसुम अरुण शिंदे व गैरअर्जदार क्र. २ शोभा प्रभाकर जाधव हे मयत **रुख्मणबाई बबनराव मोतिंगे** यांचे वारस असुन तसे प्रमाणपत्र आवश्यक ते न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर जारी करण्यात यावे. |
| ३ | अर्जदारांनी अर्जाचा खर्च सोसावा. |
| ४ | अर्ज निकाली काढण्यात येतो. |

(अर्जाचा निकाल खुल्या न्यायालयात उद्घोषित करण्यात आला.)

RUPALI SURESHCHANDRAJI TAPADIYA

Digitally signed by RUPALI SURESHCHANDRAJI TAPADIYA
Date: 2026.03.12 17:11:34 +0530

**दिनांक – १२.०३.२०२६**
**कन्नड.**

**(सौ. आर. एस. तापडीया)**
**२ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,**
**कन्नड.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

Name of the Stenographer : Rajesh M. Sonawane

Name of the Court : Smt. R. S. Tapadiya
2nd Jt. C.J.J.D., Kannad

Date of the Order : 12.03.2026

Order signed by the
Presiding Officer on : 12.03.2026

Order uploaded on : 12.03.2026